स्पर्धकाचे नाव- प्रज्योत दयाळ बुचुंडे    वय - २६ वर्षे
रा: सोनुर्ली, ता.- कोरपना, जि- चंद्रपूर
महाराष्ट्र - ४४२९१६

Email ID - pdbuchunde@gmail.com, pdbuchunde1234@gmail.com
Mob No - 7620541623, 8975327598

निबंधाचा विषय :- 'भारतीय संविधान व धर्मनिरपेक्षता'
गट क - खुला गट

मी नामे प्रज्योत बुचुंडे घोषणा करतो की, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर द्वारा आयोजित राज्यस्तरिय निबंध स्पर्धेत भाग घेतला असून सदर निबंध हा पूर्णत: माझ्या स्वहस्ताक्षरात लिखित असून पर्यवेक्षकांना हस्ताक्षराबद्दल काही संशय असल्यास मी माझ्या हस्ताक्षराचा प्रत्यक्ष नमुना देईन. जर मी हस्ताक्षराचा प्रत्यक्ष नमुना देताना नापास झाल्यास माझा निबंध स्पर्धेतून बाद करण्याचे पूर्ण अधिकार राहील.

प्रज्योत बुचुंडे

# भारतीय संविधान व धर्मनिरपेक्षता



" धर्मनिरपेक्षता की जमीन पर मोहब्बत की मिसाल बनाई जाए,
ईद दूर है तो क्या हुआ चलो आज मिलकर दिपावली मनाई जाए"

धर्मनिरपेक्षता ही संज्ञा ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ साली सरनाम्यामध्ये समाविष्ट केली गेली. याचा अर्थ असा की भारतीय राज्यसंस्थेचा असा कोणताही धर्म नसेल, धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली जाणार नाही व धर्म ही बाब केवळ खाजगी जीवनापुरती मर्यादित असेल. अर्थात राज्याद्वारे सर्व लोकांना सद्सद्विवेका-चे तसेच स्वत:च्या निवडीनुसार धर्माचा प्रचार, प्रसार व आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल.

राज्यघटनेच्या स्वरुपाबद्दल जेव्हा घटनासमितीत चर्चा झाली त्यावेळेस 'धर्मनिरपेक्षता' हे विशेषण सरनाम्यात नमूद करण्यात यावे अशी काही सदस्यांची मागणी होती. प्रा. के. टी. शहा यांनी 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवादी' ही दोन्ही विशेषणे भारतीय संघराज्याला लावावीत अशी दुरुस्तीच सुचविली होती. डॉ. आंबेडकरांनी प्रा. शहा यांच्या दुरुस्तीला विरोध करताना असे सांगितले की, "प्रजासत्ताकाला अशी विशेषणे लावणे म्हणजे लोकशाही नष्ट करण्यासारखे आहे. एका विशिष्ट मतप्रणालीचेच लोक भविष्यकाळात सत्तेवर येतील असे नाही. तेव्हा त्यांचा अधिकार मर्यादित करणारी अशी विशेषणे कशाला?" प्रा. शहा यांची दुरुस्ती घटनासमितीत नामंजूर झाली.

पुढे आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी ४२ व्या घटना दुरुस्तीने 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' अशी विशेषणे घटनेच्या सरनाम्यात समाविष्ट केली. मात्र या ४२ व्या घटनादुरुस्तीत 'धर्मनिरपेक्षता' शब्दाची व्याख्या करण्यात आली नव्हती. ४५ व्या घटनादुरुस्ती विधेयका-द्वारे धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी या शब्दाची व्याख्या देण्याचा प्रयत्न केला. परंतु या विधेयकाला राज्यसभेचा पाठिंबा मिळाला नाही. प्रस्तावित घटनादुरुस्तीने धर्मनिरपेक्ष या संज्ञेची व्याख्या 'सर्व धर्मांविषयी समान

आदर असणारे' अशी केली होती. वस्तुत: सर्व धर्माविषयी समान आदर या व्याख्येने धर्मातीत राज्याची सर्व वैशिष्ट्ये प्रगट होत नाहीत.' जे राज्य घटनात्मकदृष्ट्या कोणत्याही धर्माशी बांधील नाही आणि त्यात हस्तक्षेपही करीत नाही ; व्यक्तीला आणि समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते व व्यक्तीचा धर्म कोणताही असो तिच्याशी नागरिक म्हणून इतर सर्वांप्रमाणेच व्यवहार करते तेच धर्मनिरपेक्ष राज्य होय.' अशी व्याख्या भारतीय समाज विज्ञान कोशाने केली आहे. धर्मनिरपेक्षता या शब्दाने व्यक्त होणारी संकल्पना एक नैतिक व्यवस्था आहे. स्वातंत्र्य आणि समता या मुल्यांवर आधारलेली, धर्माला त्यात लुडबूड न करु देणारी व ऐहिक जीवनाला महत्व देणारी अशी ती व्यवस्था आहे.

"मुझसे पुछा गया मेरा धर्म क्या है ?
मैने कहा, मै इस मिट्टी की एक निशानी हूँ।
और अपने आप को किसी धर्म का बताने से पहले
मै एक हिंदुस्तानी हूँ।"

धर्मनिरपेक्षता हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. या न त्या कारणाने यावर आजतागायत भरपूर पण अस्ताव्यस्त अशी चर्चा झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून संसद अधिवेशनाच्या प्रारंभी सत्ताधारी व विरोधकांत घनघोर खल झाला तो 'धर्मनिरपेक्ष' या शब्दावर, संकल्पनेवर. घटनेच्या उद्देशिकेत धर्मनिरपेक्ष या शब्दाचा फार उशिरा समावेश करण्यात आला, असा जाणीवपूर्वक उल्लेख करण्यात आला. कारण भाजपला धर्मनिरपेक्षता या शब्दाचे वावडे, तर कॉंग्रेसला हा शब्द प्राणप्रिय. दोघांचेही त्यात मतांचे गणित आहे. एकुण चर्चेचा सूर पाहता संविधानातील इतर तरदुतीपेक्षा धर्मनिरपेक्षतेचा काय तो एकदा सोक्षमोक्ष लावून टाकू अशा अविर्भावातच ही चर्चा झाली. राज्यकर्त्या भाजपचा तो प्रयत्न होता. राजकीय स्वार्थासाठी हवा तसा सोयीचा अर्थ काढून कॉंग्रेसने

धर्मनिरपेक्षता या आधुनिक वैश्विक मूल्याची वाट लावली. भाजपला त्यांच्या धर्माधिष्ठित राजकारणातील धर्मनिरपेक्षता ही मोठी धोंड वाटते. जी संकल्पना भाजपला किंवा संघ परिवाराला अडचणीची वाटते त्या संकल्पनेची त्याच्या मुळ अर्थासह मोडतोड करणे हा त्यांचा आवडीचा खेळ. जसे आदीवासींना आदिवासी न म्हणता वनवासी म्हणायचे. धर्मनिरपेक्षतेबाबतही तसाच प्रकार दिसून येतो. भाजपने आता धर्मनिरपेक्षतेला पंथनिरपेक्ष असा पर्यायी शब्द पुढे आणला आहे. असा हा धर्मनिरपेक्षतेबाबत वेगवेगळ्या राजकीय पक्षांचा वेगवेगळा राजकीय खेळ आहे. म्हणून आपल्याला इथे कोणत्याही पक्षविशेषाच्या अथवा धर्मविशेषाच्या बाजूने न झुकता धार्मिक आणि राजकीय तटस्थ राहून धर्मनिरपेक्षतेची मुळ संकल्पना, धर्मनिरपेक्षतेचे प्रकार, भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षतेचा संबंध तसेच सध्या चर्चेचा विषय असणारे प्रश्न जसे, मुळ संविधानात धर्मनिरपेक्षतेचा उल्लेख का करण्यात आला नाही? प्रस्तावनेत धर्मनिरपेक्षतेचा उल्लेख केल्यानंतर भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र झाले की आधीच होते? भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे की पंथनिरपेक्ष राष्ट्र आहे? संविधान आणि धर्मनिरपेक्षतेचा काय संबंध आहे? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे सदर लेखातून देण्याचा प्रयत्न करुयात.

शब्दकोशानुसार 'धर्मनिरपेक्षता' या शब्दाचा अर्थ "राजकीय, नागरी किंवा सामाजिक व्यवहारांत धर्म, धर्मविचार किंवा धार्मिक कल्पना यांना दूर ठेवणे." असा होतो. लोक अनेकदा या शब्दाचा अर्थ अधर्म, निधर्मीपणा, नास्तिकता, किंवा धर्मविरोध असे लावतात. परंतु हे अर्थ चुकीचे होय. मुळात धर्म श्रेष्ठ की राजा श्रेष्ठ, धर्म श्रेष्ठ की राज्य श्रेष्ठ हा वाद विकोपाला जात असतानाच एकोणिसाव्या शतकाच्या मध्यांतराला सेक्युलर म्हणजे धर्मनिरपेक्षता या शब्दाचा जन्म झाला. हा खल अमेरिका व युरोपात शिगेला पोहोचला होता. त्याच कालखंडात ब्रिटिश लेखक-विचारवंत '<u>जॉर्ज जेकब होलीओक</u>' यांनी पहिल्यांदा धर्मनिरपेक्षता ही संकल्पना मांडली. व धर्मनिरपेक्षता अस्तित्वात येण्यासाठी पुढील चार गोष्टींचे असणे आवश्यक आहे असे सांगितले.

अ) धर्म तटस्थता :-

धर्माप्रती ना आपल्याला विरोध, तिरस्कार ठेवायचा आहे ना प्रेम, स्नेह, आपुलकी ठेवायची आहे. स्वर्ग, नरक, मोक्ष, ईश्वर आहे की नाही ह्याचे आपल्याला काहीही करायचे नाही तर धार्मिक तटस्थ राहायचे आहे.

ब) इहलोकवाद :-

आपण वास्तव्य करतो या इहलोकावर (This World) विश्वास ठेवणे. स्वर्ग, नरक, परलोक (That World), ईश्वर, मोक्ष आहे की नाही हे माहित नाही. आणि आपण कितीही प्रयत्न केले तरी हे जाणून घेऊ शकत नाही. परलोक आहे की नाही हे माहित नाही आणि ज्याबद्दल आपण जीवंतपणी जाणून घेवू शकत नाही तिथे आपली उर्जा कशाला खर्च करायची. म्हणून आहोत त्या इहलोकावर विश्वास ठेवून याच्या विकासासाठी प्रयत्न करायचा.

क) विज्ञानावर विश्वास :-

या जगात जेवढे काही संकट आहेत त्यांच्या उपायाचा मार्ग विज्ञानात आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे कोवीड-19. कोरोना विषाणूने संपूर्ण जगाला विळखा घातला होता. या छोट्याशा विषाणूपासून आपला बचाव करण्यासाठी ना कोणता धर्म येऊ शकला ना कोणी धार्मिक व्यक्ती. सर्वांना वाट होती ती म्हणजे वॅक्सीन ची. म्हणून होलीओक म्हणतो की, मनुष्याच्या मुक्तीचा मार्ग धर्म नसून विज्ञान आहे.

ड) धर्मनिरपेक्ष नैतिकता :-

पूर्वी लोक धार्मिक आणि नैतिकतेला एकमेकांत मिसळून द्यायचे. परंतू धार्मिक आणि नैतिकता ह्या दोन वेगवेगळ्या संज्ञा आहेत. कोणी धार्मिक आहे म्हणून तो व्यक्ती नैतिक आहे आणि कोणी अधार्मिक आहे म्हणून अनैतिक आहेत असे होत नाही तर धार्मिक व्यक्तीही अनैतिक असू शकतो आणि अधार्मिक व्यक्तीही नैतिक असू शकतो. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे भगतसिंग. भगतसिंग नास्तिक होते परंतू नैतिक होते. त्यामुळे होलीओक म्हणतो प्रत्येक व्यक्तीने नैतिक व्हावे, धार्मिक व्हायची अनिवार्यता नाही.

अशाप्रकारे होलीओकनी धर्मनिरपेक्षतेच्या अस्तित्वासाठी वरील चार तत्वांचा उल्लेख केला आहे. धर्म आणि व्यक्ती, धर्म आणि समाज, धर्म आणि राज्य अशा तीन वेगवेगळ्या स्तरावर धर्माचा संबंध पाहावयास मिळतो. परंतु इथे धर्म आणि राज्य यांचा संबंध महत्वाचा असल्याने तो आपल्याला पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

1) धर्मतंत्र (Theocracy) :-

धर्मतंत्र म्हणजे पूर्णपणे धर्माकडून चालविले जाणारे राज्य. अशा राज्यामध्ये धर्मग्रंथ हेच संविधान असते. आणि धर्मप्रमुख हाच राज्याचा प्रमुख असतो. अथवा राज्यप्रमुख हा धर्मप्रमुखाच्या अधीन असतो. अशा राज्यातील नागरीकांना त्या राज्याकडून धार्मिक विशेषाधिकार प्राप्त झालेले असतात. उदा. वेटिकन सिटी, तिब्बत, माऊंट एथोस, इरान इत्यादी.

2) धर्मप्रभावित राज्य (State Influenced By Religion) :-

हे राज्य धर्मतंत्र राज्यापेक्षा थोडे लवचीक असतात. इथे धर्मग्रंथ हेच संविधान नसून संविधानावर एखाद्या विशेष धर्माचा प्रभाव असतो. राज्याने एखाद्या विशिष्ट धर्माला राजकीय धर्माचा राजाश्रय दिलेला असतो अथवा नसतो. परंतु धर्मतंत्र राज्याप्रमाणेच धर्मप्रभावित राज्यातसुद्धा नागरिकांना धार्मिक विशेषाधिकार असतात. उदा. डेनमार्क, नॉर्वे, स्वीडन, फीनलंड, पाकिस्तान, बांग्लादेश, ब्रुनई, सौदी अरब, इराक, भुटान, कम्बोडिया, श्रीलंका इत्यादी.

3) धर्मविरोधी राज्य (Anty Religious State) :-

धर्मतंत्र राज्याच्या एकदम विरुद्ध विचाराचे राज्य म्हणजे धर्मविरोधी राज्य होय. हे राज्य प्रामुख्याने मार्क्सवादी विचारसरणीवर चालतात. धर्मविरोधी राज्यात धर्माला कोणतेही स्थान नसते. उदा. सोव्हिएत संघ, चीन, उत्तर कोरिया इत्यादी.

4) धर्मनिरपेक्ष राज्य (Secular State) :-

धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये ना कोणता राजकीय धर्म असतो. ना कोणता राजकीय धर्म नसणे हाच राजकीय धर्म नसतो. राज्य आणि धर्म दोघांचेही कार्यक्षेत्र भिन्न-भिन्न असतात. प्रत्येक

नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य असते. प्रत्येक नागरिकांत धार्मिक भेदभावाची अनुपस्थिती असते. धर्मनिरपेक्ष राज्याचे प्रामुख्याने सकारात्मक व नकारात्मक धर्मनिरपेक्ष राज्य असे प्रकार पडतात. सकारात्मक धर्मनिरपेक्ष राज्यात राज्य सर्व धर्माचा समान सम्मान करते परंतु कोणत्याही धर्माशी जवळीक करत नाही. भारत, इंग्लंड, अमेरिका हे सकारात्मक धर्मनिरपेक्ष राज्याची उदाहरणे आहेत. तर नकारात्मक धर्मनिरपेक्ष राज्य धर्मापासून पूर्णपणे अलिप्त किंवा दूर राहते. जसे फ्रांन्स.

अशाप्रकारे आपल्याला धर्म-राज्य संबंध ~~याच~~ किंवा राज्याचे वेगवेगळे प्रकार पाहावयास मिळतात. ज्यातुन धर्मनिरपेक्ष व इतर राज्याची संकल्पना सुस्पष्ट होते. पण आपल्यासमोर आता जो अत्यंत महत्वाचा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे "काय" भारत धर्मनिरपेक्ष आहे ?" या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला प्रामुख्याने भारतीय संविधान आणि प्रमुख कायद्यांतील धर्मनिरपेक्षतेसंबंधीच्या तरतुदी, धर्मनिरपेक्षतेबाबत भारतीय राजनितीक विचार आणि लोकशाहीचा महत्वाचा आधारस्तंभ आणि संविधानाचे संरक्षक असलेल्या न्यायपालिकेचे धर्मनिरपेक्षतेशी संबंधीत असलेले प्रमुख खटले आणि निर्णय यांचा आधार घेवून सदर उपस्थित प्रश्नाचे उत्तर व भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षतेचा संबंध स्पष्ट करता येईल.

## भारतीय राजनितिक विचार आणि धर्मनिरपेक्षता :-

राज्यघटना निर्मितीच्या वेळी व त्यानंतरही भारतामध्ये धर्मनिरपेक्षतेसंबंधी ज्या विचारधारा वाहत होत्या त्यामध्ये पुढील प्रमुख व्यक्तींच्या विचारांचे दर्शन होते.

अ) एम. एन. रॉय, नमुद्रीपाध्याय, ए. के. गोपालन :- हे सर्व व्यक्ती मार्क्सवादी विचारसरणीचे होते याचाच अर्थ असा की धर्मविरोधी होते. धर्म हा राजनिती-पासून पूर्णत: दूर ठेवावा. यांच्यानुसार धर्म असूच नये. यांच्या हातात सत्ता असती तर धर्म नष्टच करुन टाकायचे. अशी यांची धर्मविरोधी विचार-सरणी होती.

ब) जवाहरलाल नेहरु, आचार्य नरेंद्र देव :- हे दोघेही समाजवादी विचारसरणीचे होते. म्हणजेच मार्क्सवादी विचारसरणीपेक्षा थोडे लवचिक. यांच्या मतानुसार,

जर कोणी व्यक्तीगत जीवनात धर्म मानत असेल तर मानावा. परंतू राज्याने धर्मापासून एकदम दूर राहावे.

क) **महात्मा गांधी, डॉ. राधाकृष्णन :-** हे दोघेही धार्मिक होते आणि यांच्या मते, प्रत्येकानेच धार्मिक असायला हवे. म्हणूनच हे सर्व धर्माचा सम्मान करायचे म्हणजेच सर्वधर्मसमभाव. परंतू राज्यापासून धर्म वेगळा असायलाच हवा व व्यक्तीगत जीवनात धार्मिक राहायलाच हे असे यांचे मत होते.

ड) **सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, के. एम. मुन्शी :-** यांच्या मते, व्यक्तीने धार्मिक असायलाच हवे आणि राज्यापासून धर्म पूर्णपणे दूर न ठेवता राज्यानेही क्वचित किंवा काही विशेष ठिकाणी धार्मिक असायला हवे.

इ) **श्यामा प्रसाद मुखर्जी :-** यांच्या मतानुसार ज्याअर्थी मुस्लिमांना धर्माच्या आधारावर पाकिस्तान मिळाला आहे त्याअर्थी मग भारत तर हिंदू लोकांचे राष्ट्र आहे. म्हणजेच BJP आणि RSS ची जे विचारधारा आहे त्याच विचारसरणीचे शामा प्रसाद मुखर्जी होते.

संविधान निर्मितीच्या वेळेस वरील सर्व विचारधारा वाहत होत्या. परंतू जनतेचा ठोस असा पाठिंबा हा त्यावेळेस पंडित नेहरु, सरदार पटेल, महात्मा गांधी, राजेंद्र प्रसाद यांच्या बाजुने असल्याने भारतीय संविधानात यांच्या विचारांचा प्रभाव प्रामुख्याने दिसून येतो.

## संविधान, कायदे आणि धर्मनिरपेक्षता :-

भारतीय संविधानात संविधानाच्या प्रस्तावनेव्यतिरिक्त 'धर्मनिरपेक्षता' या शब्दाचा उल्लेख इतरत्र कुठेही आढळत नाही. परंतु भारतीय संविधानाच्या अनेक कलमांतून आणि काही प्रमुख कायद्यांतून धर्मनिरपेक्षतेचा भाव मात्र व्यक्त होतो तो पुढीलप्रमाणे -

- कलम १४ - राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.
- कलम १५ - धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करण्यास मनाई.
- कलम २३ - जेव्हा पण सरकार देशसेवेसाठी आव्हान करेल तेव्हा धर्म,

वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करणार नाही.

- कलम २५, २६, २७ व २८ - यामध्ये धर्मस्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. कलम २५ नुसार सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हकदार आहेत. तर कलम २६ नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, नितिमत्ता व आरोग्य यांच्या अधीनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास, धार्मिक व धर्मादायी प्रयोजनांकरिता संस्थांची स्थापना करुन त्या स्वखर्चाने चालविण्याचा, धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा हक्क असेल.
- कलम २९ - भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची वेगळी भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल.
- कलम ३० - धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.
- कलम ४४ - राज्य देशातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करेल.
- कलम ५१ क - हे कलम मुलभूत कर्तव्याचे आहेत. कलम ५१ क (५) नुसार धर्म-भाषा-प्रदेश-वर्ग वगैरे भेद विसरुन अखिल भारतीय जनतेत एकोपा व भ्रातृभाव वाढीस लावणे; कलम ५१ क (६) नुसार आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.
- कलम ३२५ - कोणतीही व्यक्ती धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणावरुन मतदार यादीत समाविष्ट होण्यास ~~अपात्र~~ अपात्र ठरणार नाही.
- लोकप्रतिनिधित्व अधिनियम (RPA) १९५१ कलम १२३(३):- कोणताही उमेदवार निवडणूक काळात धर्म, जात, वंश याच्या आधारावर मत देणे अथवा न देण्याचे आव्हान करणार नाही. असे केल्यास व ते न्यायालयात सिद्ध झाल्यास संबंधित व्यक्तीचे म्हणजे उमेदवाराचे निर्वाचन रद्द होईल.

- इंडियन पिनल कोड (IPC), क्रिमिनल प्रोसीजर कोड (CrPC), इंडियन एव्हिडन्स ॲक्ट (IEA) हे सर्व कायदे सर्व धर्मियांसाठी सारखेच आहेत. यात धार्मिक भेदभाव नाही.

वरील सर्व संविधानातील कलमा आणि कायदे धर्मनिरपेक्षतेचा भाव व्यक्त करून नागरिकांना शाश्वती प्रदान करते की, कोणत्याही धर्माच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

## न्यायपालिका आणि धर्मनिरपेक्षता :-

संविधानाची व्याख्या करणे आणि संविधानाचे रक्षण करण्याची जिम्मेदारी भारतीय न्यायपालिकेवर आहे. धर्मनिरपेक्षतेच्या बाबतीत भारतीय न्यायपालिकेने धर्मनिरपेक्षतेची संकल्पना पाळलीच नाही तर वेळोवेळी धर्मनिरपेक्षतेचे संरक्षणही केले आहे हे आपल्याला खालील काही उदाहरणावरुन स्पष्टपणे दिसून येईल.

अ) केशवानंद भारती खटला :- या खटल्याचा संबंध संविधानातील कलम ३६८ शी आहे. अंत्यत महत्वाच्या या खटल्यामध्ये निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, संविधानातील कलम ३६८ नुसार संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे परंतु याचा अर्थ असा नाही की, कलम ३६८ नुसार संसद संविधानात कोणतीही दुरुस्ती करु शकेल. संविधानातील एखाद्या विशिष्ट भागात बिघाड आला असल्यास संसद त्या विशिष्ट भागापुरती मर्यादित दुरुस्ती करु शकते. परंतु संसद संविधानाच्या पुनर्लिखानाचे काम करु शकणार नाही. म्हणजेच संसदेकडे संविधानदुरुस्ती करण्याचा अधिकार आहे परंतु तो मर्यादित आहे. कारण संविधानाचा एक मुख्य गाभा आहे आणि संसद या मुख्य गाभ्यामध्ये दुरुस्ती करु शकणार नाही.

ब) एस. आर. बोम्बई खटला :- हा खटला प्रामुख्याने संविधानातील कलम ३५६ शी संबंधीत आहे. या कलमान्वये केंद्र सरकार विविध राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लावू शकते. १९९२ मध्ये बाबरी मस्जिद तोडण्यात आली तेव्हा केंद्र सरकारने आंतरीक सुव्यवस्था आणि शांतता राखण्याच्या उद्देशाने सर्व राज्य सरकारांना निर्देश दिले होते की RSS आणि RSS ची

विचारधारा असणाऱ्या इतर समुहगटांवर विशेष नजर ठेवून त्यांच्यावर नियंत्रण ठेवावे परंतु BJP शासीत राज्यांनी त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याऐवजी त्यांना सहकार्य केले त्यामुळे त्या राज्यांत एकाचवेळेस राष्ट्रपती राजवट लावली. त्यामुळे एस.आर. बोम्बई यांनी या राष्ट्रपती राजवटीविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात खटला भरला. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना असे म्हटले की, 'धर्मनिरपेक्षता' हा संविधानाचा मुळ गाभा आहे आणि संविधानाच्या मुळ गाभ्याविरोधी कार्य करणे चुकीचे आहे. यामुळे बीजेपी शासीत सरकारे असणाऱ्या चारही राज्यात लावलेली राष्ट्रपती राजवट वैध आहे.

क) इतर खटले :- यामध्ये सर्वप्रथम जो खटला येतो तो म्हणजे १९७४ चा अहमदनगरमधील सेंट झेविअर कॉलेज विरुद्ध गुजरात राज्य आणि दुसरा म्हणजे १९९२ मधील ॲथीस्ट सोसायटी विरुद्ध आंध्रप्रदेश खटला. या दोन्ही खटल्यासंदर्भात निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, राज्य धर्मनिरपेक्ष आहे. याचा अर्थ असा नाही की, राज्य नास्तिक आहे. राज्य धर्मनिरपेक्ष आहे याचा अर्थ राज्य ना धर्मविरोधी आहे, ना धर्म-प्रभावित आहेत, ना नास्तिक आहे. नास्तिकांना वाटत असेल की राज्य धर्मनिरपेक्ष आहे म्हणजे ते कोणत्याही विशिष्ट धर्माच्या बाजुने झुकणार नाही. तर याचाच अर्थ असाही आहे की, राज्य नास्तिकांच्या बाजुनेही झुकनार नाही. राज्य नास्तिक, आस्तिक, धार्मिक, धर्मविरोधी, धर्मतटस्थ अशा सर्वांचाच समान सम्मान करेल.

त्यानंतर जे महत्वपूर्ण खटले आहेत ज्यांनी मुख्यत: भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षतेला मजबुती प्रदान केली ते म्हणजे शाह बानो खटला, शायरा बानो खटला, शबनम हश्मी खटला, डेनियल लतिफी खटला. या सर्व खटल्यांमध्ये निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, धार्मिक नैतिकतेपेक्षा संवैधानिक नैतिकता महत्वाची आहे. जर धार्मिक नैतिकता संवैधानिक नैतिकतेच्या आड येत असेल तर त्यावेळी धार्मिक नैतिकता खारीज करण्यात येईल. धार्मिक रितीरीवाज, धार्मिक परंपरा, धार्मिक नियम काहीही असो जेव्हा जेव्हा धार्मिक आणि

संवैधानिक नैतिकतेचा प्रश्न येईल तेव्हा तेव्हा धार्मिक नैतिकतेपेक्षा संवैधानिक नैतिकता महत्वाची ठरेल.

अशाप्रकारे भारतीय न्यायपालिकेने आपल्या संविधाना सोबतच धर्मनिरपेक्षतेचेही वेळोवेळी संरक्षण केले आहे, जोपासना केली आहे, धर्मनिरपेक्षतेला मजबुती प्रदान केलेली आहे. वेळोवेळी धार्मिक नैतिकतेपेक्षा संवैधानिक नैतिकता महत्वाची आहे हे पटवून दिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले तेव्हा त्यांच्यासमोर आदर्श राज्यपद्धत होती ती बुद्धकालीन गणराज्याची. जगभराच्या विशेषत: अमेरिका व इंग्लंड येथील घटना धर्मातीत होत्या. बाबासाहेबांना धर्मसत्ता अमान्य होती, ग्रंथप्रामाण्य तर मुळीच मान्य नव्हते. त्यामुळे धर्म आणि राजकारण हे दोन विभिन्न घटक. एकमेकाला समांतर असलेले. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हा शब्द मूळ संविधानाच्या उद्देशिकेत घालावा, असे बाबासाहेबांना वाटले नाही. हा शब्द अंतर्भूत करण्यात आला तो १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्तीने. या घटनादुरूस्तीच्या काळात तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी आणली होती. आणीबाणीचा कालखंड २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ हा होता. या काळात भारतीय संसद 'बापुडी' झाली होती. आणीबाणीच्या विरोधात बोलणाऱ्यांना तुरुंगात डांबले जात होते. संविधान कलम ३६८ अन्वये संसदेला बहुसंख्येने घटनादुरूस्ती करता येते. लोकसभेत २ नोव्हेंबर १९७६ तर राज्यसभेत ११ नोव्हेंबर १९७६ रोजी प्रस्ताव ठेवण्यात आला. परंतु अनेक खासदार त्या काळात तुरुंगात होते. त्यामुळे चर्चा न करता पाशवी सत्तेच्या आधारे ही घटनादुरूस्ती अमलात आली आणि मग त्यात धर्मनिरपेक्ष या शब्दाचा अंतर्भाव करण्यात आला. या ४२ व्या घटनादुरूस्तीने बदल केल्यामुळे धर्मनिरपेक्षतेचा अर्थ असा लावला गेला की, भारतीय राज्यसंस्थेला स्वत:चा असा कोणताच धर्म नसेल, धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली जाणार नाही. धर्म ही बाब केवळ खाजगी जीवनापुरतीच मर्यादित केली जाईल. याचाच अर्थ सर्व लोकांना सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून धर्माचा प्रचार, प्रसार व आचरण करण्याचे

स्वातंत्र्य असेल आणि यासाठीच २५ व्या कलमाची तरतुद करण्यात आली आहे. २०१४ साली १९७६ सारखी अमर्याद शक्ती मिळाल्यामुळे धर्मनिरपेक्षता ऐरणीवर आली. हिंदू राज्य आणायचे असेल तर राज्याचा धर्मातीतपणा नष्ट केलाच पाहिजे आणि म्हणूनच नरेंद्र मोदी यांनी संविधान दिनाचा आधार घेऊन सरनाम्यातील २३ शब्दांना पर्यायी शब्द दिले. इंदिरा गांधींनी किमान संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे प्रस्ताव तरी ठेवले होते, परंतु आता 'कोण काय करतो ते बघून घेईन' या धर्तीवर शब्द बदलण्यात आले.

भारतात १२ धर्म, १२२ भाषा व १६०० बोलीभाषा असल्यामुळे धर्मनिरपेक्षतेचा नेमका अर्थ लावणे अवघड झाले आहे. 'धर्मातीत' हा शब्द धर्मनिरपेक्षतेला न्याय देऊ शकतो. भारतातील ही विविधता लक्षात घेऊनही देशी आणि विदेशी घटनातज्ज्ञांनी आपली मते मांडली आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात जरी धर्मनिरपेक्षता या शब्दाचा प्रयोग केला नसेल, पण त्यांनी भारतीय संविधानात धर्मनिरपेक्षता आणि धर्मस्वातंत्र्याशी संबंधीत अनेक कायदे केले आहेत. भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता आणि धर्मस्वातंत्र्याचे कायदे पाश्चिमात्य धर्मनिरपेक्ष सिद्धांतापेक्षा वेगळे आहे. धर्मनिरपेक्षतेची मुळ संकल्पना धर्माला राज्यापासून वेगळे करण्यासाठी राज्याच्या संचालन आणि नीतिनिर्धारणामध्ये धर्माचा हस्तक्षेप रोखणे व सर्व धर्माच्या लोकांना संविधान, कायदा आणि शासकीय नीतिनियमांपुढे समान लेखणे अशी आहे. धर्मनिरपेक्षतेचे सकारात्मक धर्मनिरपेक्षता आणि नकारात्मक धर्मनिरपेक्षता, असे दोन प्रकार आहेत. नकारात्मक धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्महीनता, नास्तिकता किंवा धर्मविरोध. धर्माप्रती उपेक्षा, तटस्थता किंवा उदासीनता आचरणात आणणे, हा नकारात्मक धर्मनिरपेक्षतेचा दृष्टिकोन आहे. फ्रान्स नकारात्मक धर्मनिरपेक्षतेमध्ये गणला जातो. नकारात्मक धर्मनिरपेक्षतेपासून साम्यवाद उदयाला आला. सकारात्मक धर्मनिरपेक्षता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याप्रमाणे धर्म बदलण्याचा, धर्म सोडण्याचा, धर्माचे मर्यादित आचरण करण्याचा, अशा

सर्व प्रकारचे अधिकार व्यक्तीला असतात. म्हणजे धर्माबाबतीत व्यक्तीचे स्वातंत्र्य हा भारतीय धर्मनिरपेक्षतेचा दृष्टिकोन आहे. भारतीय धर्मनिरपेक्षता सकारात्मक धर्मनिरपेक्षता आहे. भारतीय संविधान धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. त्यामुळे व्यक्ती धर्माच्या परिप्रेक्ष्यात धार्मिक, निधर्मी वगैरे असु शकते पण शासनव्यवस्था निधर्मीच राहते. कुठल्याच धर्माचा अनुनय आणि कुठल्याच धर्माचा द्वेष यात अपेक्षित नाही. संविधान धार्मिक स्वातंत्र्य देते याचा अर्थ ते धर्माला स्वातंत्र्य देत नाही तर धर्माच्या बाबतीत प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य देते. अमेरिका, इंग्लंड आणि भारत सकारात्मक धर्मनिरपेक्षतेमध्ये गणले जातात. अशाप्रकारे संविधान आणि धर्मनिरपेक्षतेचा संबंध आहे.

"छोड़ो धर्म पर लड़ाई, छोडो झूठी शान
सबका मजहब एक है, एक हैं सब इन्सान।
जीजस, अल्लाह एक है, एक ही है हनुमान
सबका मजहब एक है, एक हैं सब इन्सान।
क्या मंदीर की घंटी, क्या मस्जिद की अज़ान
सबका मजहब एक है, एक हैं सब इन्सान।
छोड़ो धर्म पर लड़ाई, छोड़ो झूठी शान
सबका मजहब एक है, एक हैं सब इन्सान।"

शब्दसंख्या - २४००-२४५०

संदर्भ - भारतीय संविधान, भारतीय संविधान व राजकारण भाग-१, इंडिन पॉलिटी, भारतीय राजकीय विचार, मराठी विश्वकोश, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, तरुण भारत दैनिक, परिक्रमा मासिक इत्यादी.